MHSN070009922023 नियमित दरखास्त क्र.०५/२०२३

## नि.क्र. १७ वरील आदेश

डी एच यांनी सदरचा अर्ज प्रस्तुतच्या प्रकरणातील जे डी क्र. १ यांचे मृत्यूनंतर वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेने सदर विलंब माफ होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रस्तूत कामातील जे.डी. क्र. १ हे मयत झालेने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता अर्ज नि. १३ दिलेला होता. सदरचा अर्ज दि. २३.०७.२०२४ रोजी मंजूर करण्यात आला होता. परंतू सदर आदेशानुसार नि. १ कडे १४ दिवसांत दुरूस्त करणे आवश्यक होते. तथापि दरखास्त दाखल करतेवेळी मूळ फाईल मे. न्यायालयात जमा करुन घेतलेने नि. १ कडे दुरूस्त करणे अशक्य झाल होते. सदर दुरूस्ती करणेस १ वर्ष ११ महिने १६ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब डी एच यांच्याकडून जाणून बुजुन केलेला नसून तो वर नमुद कारणंमुळे झालेला आहे. सबब अर्ज मंजूर करुन दुरुस्ती करण्यास परवानगी असावी अशी विनंती केली आहे.

३. जे. डी. यांचे वारसांनी सदर अर्जावर म्हणणे सादर केलेले नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणणेविना चालवण्यात आला.

४. सदरची संचिका ही इ फाईल पध्दतीने दाखल करण्यात आलेली असून

मयत जे. डी. यांचे वारस अभिलेखावर घेवून त्याबाबत दुरूस्ती करण्याची राहून गेल्याचे डी. एच. यांचे कथन आहे. अर्जातील नमुद कारणाच्या पुष्टयर्थ जरी कोणतेही ठोस कारण नमुद केले नसले तरीही प्रस्तूतची दरखास्त ही न्यायालयाच्या आदेशा संदर्भात आहे. जे.डी यांनी हजर राहून कोणताही आक्षेप नोंदवलेला नाही. त्यामुळे न्यायदानाच्या दृष्टीने तसेच दाखल संचिकेचे स्वरुप विचारात घेता अर्ज मंजूर करून दुरूस्ती प्रत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. १७ मंजुर करण्यात येत आहे.

२. डी एच यांनी दुरूस्त प्रत त्वरीत दाखल करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.08.18 17:26:08 +0530

**कवठे महांकाळ.** **(एम.ए.कुलकर्णी)**

**दिनांक:– १८.०८.२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क स्तर**

**कवठे महांकाळ.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 18.08.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 18.08.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 18.08.2026 |